गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
Titie code MAHMAR 52037
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १४० | शनिवार २० मे २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 140 | Date : 20/05/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4

# २००० रुपयाच्या नोटा चलनातून बंद



**नोटा कधीपासून बदलता येणार?**

**आरबीआयने २००० रुपयांच्या नोटा असलेल्या नागरिकांना बँकांमधून नोटा बदलण्याची सूचना केली आहे. बँकांमध्ये २३ मे पासून ही २००० रुपयांची नोट बदलण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. नागरिकांना ३० सप्टेंबरपर्यंत नोटा बदलता येणार असल्याची माहिती आरबीआयने दिली आहे.**

नवी दिल्ली : भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठा निर्णय घेतला आहे. आरबीआयने बाजारातून २००० रुपयांच्या नोटा मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत नोटा वापरता येणार असल्याचे आरबीआयने म्हटले असल्याचे वृत्त 'पीटीआय'ने दिले आहे. २०१८-१९ मध्येच २००० रुपयांच्या नोटांची छपाई थांबवण्यात आली होती. नागरिकांना २००० रुपयांच्या नोटा बदलून घेण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने चलनातून दोन हजार रुपयांच्या नोटा मागे घेण्याची घोषणा केली आहे. मात्र, सध्या बाजारात असलेल्या दोन हजार रुपयांच्या नोटा व्यवहारासाठी वापरता येणार असल्याची माहिती आरबीआयने दिली आहे. या नोटा ३० सप्टेंबरपर्यंत वैध राहणार आहेत. तोपर्यंत ज्यांच्याकडे दोन हजार रुपयांच्या नोटा आहेत, त्यांनी बँकेकडून नोटा बदलून घ्याव्या लागणार आहेत.

एका वेळी किती नोट बदलता येणार?

एकावेळी फक्त २ हजार रुपयांच्या नोटा २० हजार रुपयांपर्यंत बदलू शकता. यासाठी बँकांना विशेष खिडकी उघडावी लागणार आहे. नोव्हेंबर २०१६ मध्ये नोटाबंदीनंतर २००० हजार रुपयांची नोट चलनात आली. नोटाबंदीमध्ये ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बंद करण्यात आल्या होत्या.

मागील तीन वर्षात २००० रुपयांची एकही नोट छापली नाही

२०१६-१७ या आर्थिक वर्षात २००० रुपयांच्या ३५४२९.९१ कोटी नोटा छापल्या होत्या. यानंतर २०१७-१८ मध्ये अत्यंत कमी १११५.०७ कोटी नोटा छापण्यात आल्या आणि त्यात आणखी कपात करुन २०१८-१९ मध्ये केवळ ४६६.९० कोटी नोटा छापण्यात आल्या. २०१९-२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ या तीन आर्थिक वर्षांमध्ये २००० रुपयांची एकही नोट छापलेली नाही.

२००० रुपयांच्या बनावट नोटांची संख्या वाढली

**। पान २ वर**

# कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री सिद्धरमय्या यांचा आज शपथविधी

## उपमुख्यमंत्री म्हणून डीके शिवकुमार घेणार शपथ

कर्नाटक : कर्नाटक विधानसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर काँग्रेस आज सरकार स्थापन करणार आहे. काँग्रेस नेते सिद्धरमय्या आज कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री आणि डीके शिवकुमार उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. मंत्रिमंडळात सामील होणारे काही आमदारही पद आणि गोपनीयतेची शपथ घेणार आहेत. शपथविधी समारंभाच्या अगोदर, सिद्धरमय्या आणि शिवकुमार नवीन मंत्रिमंडळात समाविष्ट करण्यात येणार्या मंत्र्यांची नावे आणि खात्यांच्या वितरणाबाबत हायकमांडशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला पोहोचले आहेत.



काही तासांत मुख्यमंत्री म्हणून सिद्धरमय्या आणि उपमुख्यमंत्री म्हणून डीके शिवकुमार पद आणि गोपनीयतेची शपथ घेतील. या शपथविधी सोहळ्याला काँग्रेसकडून विरोधी पक्षांच्या अनेक नेत्यांना निमंत्रित करण्यात आलं आहे. लोकसभा निवडणुकीला अद्याप जवळपास एक वर्ष बाकी असल्याने २०२४ च्या निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या एकीचं प्रदर्शन म्हणून कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याकडे पाहिलं जात आहे. सिद्धरमय्या आणि शिवकुमार यांनी शुक्रवारी राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांची भेट घेतली. काँग्रेसने आपल्या अधिकृत हँडलवरून या बैठकीचे फोटो ट्विट केले आहेत. या फोटोला कॅप्शन देत लिहिलं आहे की, कर्नाटकमधील लोकांच्या सरकारच्या शपथविधीपूर्वी एक बैठक. तसेच सिद्धरमय्या यांनी दिल्लीत काँग्रेस संघटनेचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांचीही भेट घेतली.

कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा बंगळुरूच्या श्री कांतीराव स्टेडियमवर आयोजित करण्यात आला आहे. या स्टेडियममध्ये सिद्धरमय्या यांनी २०१३ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. राज्यपाल थावरचंद गेहलोत दुपारी १२:३० वाजता कांतेराव स्टेडियमवर मुख्यमंत्री आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला पद आणि गोपनीयतेची शपथ देतील. २०१३ मध्ये पाच वर्षांच्या कार्यकाळानंतर सिद्धरमय्या आज दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची। **पान २ वर**

# मान्सून दक्षिण अंदमानच्या समुद्रात तीन दिवस आधीच दाखल

## पुढील तीन-चार दिवसात बंगालच्या उपसागरात येणार

मुंबई: नैऋत्य मान्सून आता अंदमान समुद्राच्या काही भागात दाखल झाला आहे अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. पुढील तीन ते चार दिवसात दक्षिण बंगालच्या उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान, निकोबारच्या आणखी काही भागांमध्ये मान्सून पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचीही माहिती देण्यात आली आहे.

तर ४ जून रोजी मान्सून केरळात दाखल होणार आहे. साधारण २२ मे रोजी मान्सून हा अंदमानात दाखल होत असतो, या वर्षी मात्र तीन दिवस आधीच हा मान्सून दाखल झाल्याचं चित्र आहे. यावर्षी मान्सूनचे आगमन चार दिवस उशीरा होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे दरवर्षी १ जून रोजी केरळमध्ये दाखल होणारा मान्सून हा या वर्षी ४ जून रोजी दाखल होणार आहे.

दरवर्षी मान्सूनची वाटचाल कशी असते?

२२ मे - अंदमान

१ जून - केरळ

७ जून - महाराष्ट्र

स्कायमेट या खाजगी एजन्सीनंही अंदमानमध्ये मान्सून उशिरानं दाखल होण्याचा अंदाज वर्तवला आहे. पण यंदा मान्सूनची सुरुवात कमकुवत दिसतेय. त्यामुळं तो विलंबाने दाखल होईल असा अंदाज स्कायमेटच्या शास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. दरम्यान, महाराष्ट्रात ९ जून आणि मुंबईत १५ जूनपर्यंत मान्सूनचं आगमन होण्याची शक्यता आहे.

वेगारीस ऑफ द वेदरकडून केरळात मान्सून उशिरा दाखल होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ४ जूनपर्यंत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. तर महाराष्ट्रात ९ तारखेपर्यंत आणि मुंबईत १५ जूनपर्यंत मान्सूनचे आगमन होणार असल्याचं भाकित वेगारीस ऑफ द वेदरने वर्तवलं आहे.

दरम्यान दक्षिण भारतीय महासागर परिसरात एक चक्रीवादळ तयार होत असल्याने बाष्प तिकडे ढकलले जातील. अशात मादागास्कर परिसरात उच्च दाब तयार होण्यास आणखी काही दिवस लागण्याची शक्यता अशात मान्सूनचे ढग तयार होण्यास उशीर होण्याचा अंदाज आहे.

स्कायमेटकडून यंदाचा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे तर भारतीय हवामान विभागाकडून यंदाचा मान्सून सर्वसाधारण राहण्याचा अंदाज जाहीर करण्यात आला आहे. यावर्षी उत्तरेकडे जूनपर्यंत उष्ण हवामान कायम राहण्याचा अंदाज, त्यामुळे पेरणीला देखील उशील होऊ शकतो.

# सामान्य माणसांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवा : उपमुख्यमंत्री फडणवीस



नागपूर : शासनाच्या विविध कल्याणकारी योजना सर्वसामान्य माणसांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी आणि या योजनांना गती देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, या योजना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिल्यात.

देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सावनेर येथील तहसिल कार्यालयात आज कळमेश्वर आणि सावनेर तालुक्याची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.शासकीय योजना सामान्य माणसांपर्यंत पोहोचाव्या यासाठी नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यांमध्ये आढावा बैठक घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन दिवसांमध्ये एकूण चार मतदारसंघांमध्ये आढावा बैठकी घेतल्या जाईल. शासनाच्या प्रत्येक योजना शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचतात अथवा नाही हे प्रत्यक्ष जाऊन पाहणे लोकप्रतिनिधींचे कार्य असून त्यासाठी आढावा बैठकांच्या आयोजन करण्यात आल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

जलसंधारणाच्या कामांमध्ये लोक सहभाग वाढला आहे. नुकतेच केंद्र शासनाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात सन २०१८-१९ मध्ये **। पान २ वर**

# व्हिडीओ लाईक करुन पैसे कमवा.. असा मॅसेज आला तर सावधान; क्षणात बँक खाते होईल रिकामे

मुंबई : व्हिडीओ लाईक करुन पैसे कमावा, अशा आशयाचा मॅसेज तुम्हालाही आला असेल तर सावध व्हा. कारण, फक्त मुंबईच नाही तर देशभरात सायबर भामट्यांकडून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. यासाठी पार्टटाईम नोकरीचं आमिष देऊन सुरुवातीला तुम्हाला पैसे ट्रान्सफर देखील केली जाते. एकदा तुम्ही ट्रॅपमध्ये सापडला की मग सुरू होतो खेळ. कशी केली जाते फसवणूक? चला जाणून घेऊ.

सायबर भामट्यांचा नवी ट्रीक

मुंबई शहर तसेच संपुर्ण देशात जपश्रळपश ढरीज्ञ ऋरींव धींढींलश डळज्ञश च्या माध्यमातुन सामान्य जनतेला पार्ट टाईम जॉबची भुरळ घालून मोठ्या प्रमाणात नागरिकांची फसवणुक होत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यात नागरीकांना त्यांचे व्हॉटसॅपवर मेसेजद्वारे च्या माध्यमातुन जनतेला पार्ट टाईम जॉब करण्यास उद्युक्त करुन त्याद्वारे प्रत्येक लाईकसाठी रु. ५० ते १५० पर्यंतची रक्कम नागरीकांच्या बँक खात्यावर जमा करण्याचे आमिष दाखविले जाते. नागरीकांनी पार्ट टाईम जॉब करण्यास सहमती दर्शविल्यावर प्रथम प्रायोगिक तत्वावर त्यांना टेलिग्राम खात्याशी जोडले जाते. अशा टेलिग्राम खात्यावर नागरीकांस भ्दलूलं %गद प्राप्त होतात त्यास टास्क असे म्हणतात.

सदर व्हिडीओ पाहून ते लाईक करुन नागरिकांनी टेलिग्राम खात्यावर पाठविल्यानंतर नागरीकांच्या बँक खात्यावर पैसे पाठवले जातात. यापुढे नागरिकांना पेड टास्क घेण्याचे व अधिक पैसे कमवण्याचे आमिष दाखविले जाते. त्यासाठी रुपये पाच हजार ते पाच लाख किंवा त्यापेक्षा जास्त इतक्या रक्कमेचे टास्क दिले जातात. पीडित जितका जास्त आमिषाला बळी पडेल तितक्या जास्त रक्कमेचे टास्क त्यास दिले जाते.

पहिले काही लहान टास्क पूर्ण केल्याचे पैसे नागरिकांना त्यांचे बँक खात्यावर दिले जातात. मात्र, मोठ्या रक्कमेची गुंतवणूक झाल्यावर काही ना काही कारण सांगुन रिटर्नसच्या स्वरुपात मिळणारा नफा व मुद्दल देण्यास टाळाटाळ केली जाते. पुर्वीच्या टास्कची रक्कम परत मिळवण्याकरीता आणखी मोठी रक्कम भरून पुढील टास्क पूर्ण करण्याबाबत नागरीकांना भाग पाडले जाते. अशा रितीने लोकांकडून पैसे उकळुन त्यांची फसवणुक केली जाते.

# ज्या कारागृहात उद्घाटन केले, त्याच कारागृहात कैदी झाले प्रदीप कुरुलकर



पुणे :पुण्यातील संरक्षण संशोधन संस्थेचे (डीआरडीओ) संचालक प्रदीप कुरुळकर यांना हनीट्रॅपमध्ये अडकवून पाकिस्तानला माहिती दिल्याप्रकरणी एटीएसने अटक केली आहे. कुरुळकर यांना २९ तारखेपर्यंत न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. ींध चे संचालक डॉ. प्रदीप कुरुलकर त्यांच्या संचालकपदाच्या कार्यकाळात अनेक कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले आहेत. १४ ऑक्टोबर २०२२ रोजी पुण्यातील येरवडा कारागृहातील बंदीनी तयार केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कुरुलकर हे उपस्थित होते. आज त्याच प्रदीप कुरुलकरांवर हनी ट्रॅपमध्ये अडकल्याने कैदी म्हणून येरवडा कारागृहात जाण्याची वेळ आली आहे.

प्रदीप कुरुलकर येरवडा कारागृहात उद्घाटन करतांना

कुरुळकर येरवड्यात कारागृहात : संरक्षण संशोधन संस्थेचे (ींध) पुणे संचालक प्रदीप कुरुलकर यांना २ मे रोजी पाकिस्तानला डीआरडीओची माहिती पुरवल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. अटकेनंतर कुरुळकरला ९ तारखेपर्यंत एटीएस कोठडी सुनावण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर केल्यानंतर त्यांना १५ तारखेपर्यंत एटीएस कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर परत कुरुळकरला एक दिवसाची एटीएस कोठडी सुनावण्यात आली.**। पान २ वर**

# कोणत्या देवाने सांगितले की मुले अध्यर्या चड्डीत आल्यावर त्यांना दर्शन घेऊ देऊ नका : अजित पवार

पुणे : काही जण या गोष्टींचा बाऊ करत आहेत. तुळजापूर येथे जे काही घडले ते आक्षेपार्ह आहे. यात तातडीने सरकारने लक्ष दिले पाहिजे. तसेच तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी देखील लक्ष घातले पाहिजे. अशी बंधने आणू नये की, ज्यामुळे नवीन प्रश्न निर्माण होतील, असे अजित पवार म्हणाले.

बजरंगबलीचा मुद्दा कुचकामी ठरला: पवार म्हणाले की, कर्नाटकचा निकाल लागल्यानंतर आपण बघितले की बजरंगबली यांना डोळ्यासमोर ठेवून सत्ताधारी भाजपकडून प्रचार करण्यात आला. सभेला जात असताना तिथे जाणीवपूर्वक बजरंग बलीची मूर्ती देण्यात आली. पंतप्रधानांनी देखील आवाहन केले होते की, बजरंग बलीला डोळ्यासमोर ठेवून बटण दाबा; पण तसे काहीही झाले नाही.

तर जनता सहन करणार नाही: आपला महाराष्ट्र हा पुरोगामी आहे. मधल्या काळात त्र्यंबकेश्वर, शेवगांव तसेच अकोल्याला जे घडल आहे ते घडता कामा नये. यात राज्य सरकारची महत्त्वाची जबाबदारी आहे. कोणीही भावनिक मुद्दा पुढे करून धर्माधर्मात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असेल तर या राज्यातील जनता ते कदापि सहन करणार नाही. त्र्यंबकेश्वर येथे काही संघटना पुढे आल्या आणि त्यांनी गोमूत्र शिडकले. कोणी काय करावे हे ज्याचा त्याचा प्रश्न आहे. या राज्यात सर्वच **। पान २ वर**

## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

# मानसिकता महत्वाची..

महाराष्ट्रातही आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण काही कमी होताना दिसत नाही. त्यातही मराठवाडा परिसरात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण भयावह आहे. या पार्श्वभूमीवर औरंगाबादच्या विभागीय आयुक्तांनी सर्वंकष पाहणीद्वारे राज्य सरकारला एक महत्त्वाची शिफारस करण्याचे ठरवले आहे. त्यांनी म्हटले आहे की, येथील शेतकऱ्यांना प्रत्येक पीक हंगामाच्या आधी एकरी दहा हजार रुपयांची मदत थेट स्वरूपात दिली जावी. अशी योजना तेलंगणा या राज्यात राबवली जात आहे. त्याचा शेतकऱ्यांना चांगला लाभ होईल. कारण या मदतीच्या आधारे शेतकरी बियाणे खरेदी करू शकेल आणि आपली शेती पेरणीयोग्य करू शकेल. नंतरच्या काळात तो कर्ज न घेता आपली व्यवस्थित वाटचाल करू शकेल. औरंगाबादच्या विभागीय आयुक्तांची ही शिफारस शिंदे सरकारच्या किती पचनी पडेल हे माहिती नाही. मुळात अशी चाकोरीबाहेरची शिफारस राज्य सरकारला केल्याबद्दल विभागीय आयुक्तांवरच कारवाई न झाली म्हणजे मिळवली. राज्यातील सरकार काय किंवा केंद्रातील सरकार काय शेतकऱ्यांच्या बाबतीत किती बेफिकीर आहे याविषयी पुन्हा वाच्यता करण्याची गरज नाही. त्या कहाण्या एव्हाना सर्वांनाच माहीत झाल्या आहेत. पिकाला चांगला बाजारभाव मिळणे ही शेतकऱ्यांची मूलभूत मागणी आहे. एवढे काम झाले तरी शेतकरी स्वत:चे अर्थकारण नीट चालवू शकतो. पण किमान आधारभूत किमतीच्या बाबतीतही सरकारकडून मोठीच मखलाशी सातत्याने सुरू आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या तोंडाला पानेच पुसली जात आहेत. खत स्वस्तात न मिळणे, पिकाला चांगला भाव न मिळणे, पाण्याअभावी पिकांचे नुकसान होणे, अवकाळी पावसासारख्या समस्यांमुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांची नासाडी होणे, पूर्वीचे कर्ज थकले म्हणून नवीन कर्ज न मिळणे अशा असंख्य समस्यांच्या तावडीत हा शेतकरी सापडला आहे. याच साऱ्या समस्या बेभरवशी पावसाच्या मराठवाड्यासारख्या शेतकऱ्यांनाही अधिक तीव्रतेने भेडसावत आहेत. तेथे सिंचनाचे प्रमाणही खूप कमी आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील शेतकऱ्यांना प्रत्येक हंगामाच्या आधी एकरी दहा हजार रुपयांची थेट सरकारी मदत मिळाली तर त्यांना मोठा हुरूप येऊ शकतो. विभागीय आयुक्तांची ही शिफारस एक प्रयोग म्हणून राज्य सरकारने तातडीने मान्य करायला हवी. असे झाले तर तेथील हजारो शेतकरी खऱ्या अर्थाने राज्य सरकारला दुवा देतील आणि त्यांच्यातील जगण्याची उमेद वाढेल. पण त्यासाठी सरकारची मानसिकता असणे महत्त्वाचे आहे.

# दंगली धार्मिक की राजकीय...?

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. त्यातही महाराष्ट्र हा संताची व महापुरुषांची भुमी आहे. संत आणि आणि महापुरुषांचे कार्य व विचार मानवता, समतादेवर आधारित असून अंधश्रद्धा, अज्ञान, पाखंड आणि चुकिच्या रुढीपरंपरा यावर वार करून माणसाला माणुसकी ची शिकवण देऊन समाजाला एकोप्याने जगायला शिकवले. संताच्या या विचाराच्या प्रभावाने जाती धर्माचे लोक एकत्र नांदत आहेत. अनेक गावामध्ये, शहरामध्ये अनेक परंपरा अशा आहेत कि ज्यामधुन मानवतेचे दर्शन होते. धार्मिक भेद न पाळता मानवाच्या ऐक्याचे चित्र वास्तवात दिसते. हिंदु मुस्लिम जैन ख्रिश्चन बौद्ध असा कोणताही भेद न करता धर्माचा गवगवा न करता माणूस म्हणून वावरतात व सर्व सामाजिक कार्यात सर्व जन एकत्र येऊन आनंद साजरा करतात. ही महाराष्ट्रात वैचारिक परंपरा आहे. संत काळामध्ये संतानी वैचारिक प्रबोधन करताना कुठे ही धार्मिक दंगल झाल्याचे वर्णन आढळत नाही. कारण संताचे विचार हे धार्मिक नसुन ते मानवकल्याणाचे होते व आहेत. ज्या ज्या वेळी माणसावर संकटे आली तेव्हा तेव्हा धर्माचा विचार न करता माणूस म्हणून समोर येऊन लढणारे लोक हे मानवतेची शिकवण देणारे आदर्शच आहेत. देशाला ब्रिटीशांकडून स्वातंत्र्य मिळण्यासाठी जो लढा उभा राहीला तो लढा लढताना त्यामध्ये सर्वच जातीधर्माचे लोक होते तर ते धर्म बघुन नव्हे तर कर्म बघून एकमेकांच्या खांद्याला खांदा लाऊन लढले, प्रत्येकाचे रक्त सांडले. रक्त सांडले गेले तेव्हा ते भारतीय होते. भारतीय म्हणून लढत लढा देऊन देशाला स्वातंत्र्य मिळावे या उद्देशाने प्रत्येक जन लढत होता तेव्हा ही कोणाच्या मनामध्ये धर्म जात नव्हती तर केवळ देश होता. असे अनेक उदाहरणे आपल्याला सामाजिक ऐक्याचे देता येतील. म्हणजे थोडक्यात काय तर सामाजिक ऐक्य व सामाजिक बंधुता अनेक दिवसापासून सुरू आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर आपले शिक्षण, वर्तन व विचार हे देशहिताचे, राष्ट्रप्रेमाचे, एकोप्याचे व बंधुभावाचे असताना अचानक धार्मिक दंगली व्हायला सुरुवात कशी झाली हेही समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रहीत, राष्ट्रप्रेम बाजूला सारून धर्मप्रेम व धर्महीत यामध्ये रुपांतर होऊन माणसात दुरावा निर्माण केला जात आहे हे मात्र चुकिचे आहे. लोकशाहीच्या नावाखाली सत्तेत जाण्याची संधी मिळाली. लोकशाही मध्ये प्रतिनिधी होऊन सत्तेत बसण्याची संधी मिळालेल्या लोकांचे देशप्रेम व राष्ट्रहीत या संकल्पना हळूहळू पुसट होत जाऊन, सत्तेचा गैरवापर वापर करून लोकांची कामे न करता कामामध्ये कामचुकार पणा करून, पैशाचा गैरव्यवहार करून स्वतः चे घरे भरायला सुरुवात केली. जनतेचा पैसा लोकप्रतीनुधींनी स्वतः फायद्यासाठी वापरल्याने लोकांच्या समस्या समुळ नष्ट होत नव्हत्या. निवडणुकी मध्ये काम, व विकासावर लोकांच्या दारी मत कसे मागावे काही मुद्दा पाहिजे म्हणून राजकीय पक्षांनी अनेक धार्मिक तेढ निर्माण होईल असे मुद्दे बाहेर काढले. व थोड्या फार प्रमाणात धर्माचा आधार घेऊन निवडणूका जिंकायला सुरुवात केली. जेव्हा राजकारणी लोकांना कळाले धर्माच्या नावावर निवडणूका जिंकता येतात तेव्हा त्यांनी लोकहिताचे कामे बाजूला सारून धर्मावर काम करायला सुरुवात केली आणि निवडणूकीच्या अगोदर धार्मिक वातावरण दुषित करून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करण्यात आला. सध्या अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे कि जेव्हा जेव्हा निवडणुका जवळ येतात तेव्हा तेव्हा दंगली घडतात. अर्थात ह्या दंगली धार्मिक नसतात. कारण जर दंगली धार्मिक असत्या तर कोणताही एका धर्माचा फायदा झाला असता अथवा धर्माचे उद्दिष्ट साध्य झाले असते. परंतु येथे दंगली झाल्या की राजकीय लोकांचा फायदा होतो मग याला धार्मिक दंगल म्हणायची का? पाचवर्षे आनंदाने नांदणाऱ्या लोकांमध्ये निवडणूक आली की संघर्ष होतो कसा? निवडणुका जवळ आल्या की मिडिया वाले जागे होऊन धर्मा धर्मात वाद व दुफळी निर्माण होईल अशा बातम्या प्रसारित करतात. मग निवडणूक नसेल तर सर्व काही ठिक असते का? दंगल ज्या ठिकाणी झाले तेथील स्थानिक लोक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात आणि राजकारणी लोक राजकारण करतात. यावरून हेच स्पष्ट होते की धार्मिक दंगल होत नाही परंतु राजकीय मताची जुळवाजुळव करण्यासाठी राजकीय दंगलीला धार्मिक दंगलीचे स्वरूप दिले जाते. जर खरचं धर्मासाठी दंगल झाली असती तर नेत्यांचे मुले दंगली मध्ये उतरली नसती का? नेते धर्माचे नाहीत का? मग धर्माच्या नेत्यावर धार्मिक दंगलीचे गुन्हे दाखल का होत नाही. किंवा नेते धार्मिक दंगलीच्या ठिकाणी का राहत नाही. दंगल जर धर्माच्या नावावर होत असेल तर नेते दंगल संपल्यावर दोन्ही गटांना समजून का सांगतात. चुकिच्या गटावर कारवाई सत्य गटाला न्याय का मिळत नाही? खरचं धार्मिक दंगली घडल्या असत्या तर समोर निवडणूक बघुन घडलीच नसती. दुसरी महत्वाची गोष्ट धार्मिक दंगल खरचं घडली असती तर तेथे शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी खुप कष्ट घ्यावे लागले असते. खरचं धार्मिक दंगल घडत असेल तर त्याला खुप मोठी अगोदरची कारणे व द्वेष असतो. परंतु आता दोघांमध्ये वैयक्तिक कारणावरून वाद जरी झाला तरी त्याला धार्मिक दंगलीचे स्वरूप देऊन वातावरण दुषीत करण्याचा व त्या आडून राजकारण करण्याचा डाव सुरू आहे. राजकीय लोक आपल्या भक्तांना तसे कृत्य करायला समर्थन करतात व राजकीय पोळी भाजून घेतात. राजकीय दंगल झाल्यावर मत माघायला जाताना शिक्षण, आरोग्य,रोजगार महागाई हे मुद्दे बाजूला ठेवून धर्म व धर्माच्या नावाखाली राजकीय निर्मीत दंगलीमधील लोकांना न्याय मिळवून देऊ या मुद्द्यावर मत माघायला मोकळे होते. म्हणजेच दंगली धार्मिक नसुन राजकीय असतात पण त्याला मतासाठी धार्मिक बनवले जाते. राजकीय दृष्टिकोन समोर ठेवून घडवलेल्या दंगली निवडणूक पुर्वीच होतात, दंगलीच्या नावावर मते मागितले जातात, धर्म धोक्यात आहे सांगितले जाते. कोणताही धर्म एवढा कमकुवत नसावा कि दोन चार वाईट मानसाच्या कृत्यामुळे धर्माला धोका निर्माण व्हावा. दुसरा प्रश्न उरतो तो दंगली मध्ये सहभागी असलेल्या लोकांचा. अनेक लोक राजकीय ईमानदारी म्हणून, नेत्याचा शब्द म्हणून स्वतः दंगली मध्ये सहभागी होतात केसेस लाऊन घेतात राजकारणामुळे आयुष्य बरबाद करतात. वाईट प्रवृत्तीचे लोक प्रत्येक धर्मात, क्षेत्रात असतात पण याचा अर्थ असा मुळीच नाही तो पूर्ण धर्मच चुकिचा किंवा आरोपी आहे. चोरी लुटमार, बलात्कार, खुन खराबे प्रत्येक धर्मातील लोक करतात, परंतु धर्माचे राजकारण करणारे लोक त्याची मांडणी चुकिच्या पद्धतीने करतात. मिडिया कोणतीही शहानिशा न करता राजकीय दबावाखाली सरकारची भुमीका मांडत आहे हे सर्व मान्य आहे. गुन्हा हा गुन्हा असतो, गुन्हेगार हा गुन्हेगार असतो. गुन्हा व गुन्हेगाराला धर्म नसतो. परंतु राजकीय पोळी भाजताना लोकांच्या जिवावर राजकारण करून लोकांनाच आरोपी बनवून राजकीय लोक सत्ता उपभोगतात. राजकीय नेत्याचे कार्यकर्ते, धर्माचे लोक साहेबांच्या कार्यक्रमाची तयारी करायला कामी येतात. म्हणून देशातील प्रत्येक नागरिकांनी देशाप्रती जागृत होऊन धर्माला वैयक्तिक बाब समजून आपले आचरण करावे. कोणत्याही बाबीविषयी भावनिक न होता त्या मधले तथ्य शोधावे. व सत्याची बाजु घ्यावी. असे झाले तर धार्मिक दंगलीची जाणीवच होणार नाही. परंतु दुसऱ्या धर्मातील चुकिच्या कृत्याला आपण त्यांच्या धर्माशी जोडायचे, यांच्या चुकीच्या कृतीला त्यांनी धर्माशी जोडायचे हे बरोबर आहे का? कोणता धर्म चुकिचे कृत्य करायला व चुकिचे कृत्य करणाऱ्यांना समर्थन करण्याची परवानगी देतो. जर धर्मच परवानगी देत नाही तर द्वेष आणि इतर धर्मातील मोजक्या चुकिच्या लोकांमुळे पुर्ण धर्मच चुकिचा आहे म्हणून त्यि धर्माचा द्वेष करणे आणि तेही जेव्हा राजकारणी लोक सांगतात तेव्हाच..! राजकीय लोकांना आपण शिक्षण, रोजगार, आरोग्य महागाई यावर प्रश्न विचारले पाहिजे तेव्हा आपल्याला राजकीय लोकांचा खरा चेहरा कळतो. परंतु आपले काम राजकीय नेते करत नाहीत पण राजकीय नेत्यांचे द्वेष, धार्मिक दंगल करण्याचे मोजकेच लोक काम करतात आणि सर्वांना बदनाम करतात हे थांबले पाहिजे. आणि कुठेही चुकिचे कृत्य घडत असेल तर त्यावर रितसर कारवाई देखील करायला पाहिजे. परंतु राजकीय नेत्यांचे ऐकुन राजकीय दंगलीला धार्मिक दंगल बनवू नये. आपल्या राष्ट्रात, राज्यात सुख शांती व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे काम जागृत नागरिकच करू शकतात. म्हणून कोणताही दंगली ला धार्मिक दंगल समजण्या अगोदर त्याची पुर्ण माहिती घ्या. म्हणजे दंगल धार्मिक आहे की राजकीय आहे हे आपल्या लक्षात येईल. व होणारी सर्वसामान्य लोकांची हानी आपण टाळू शकू.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता मेहकर**
**मोबा ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## २००० रुपयाच्या..

दरम्यान, संसदेत १ ऑगस्ट २०२२ रोजी दिलेल्या उत्तरात म्हटलं होतं की छउठइ डेटानुसार, २०१६ ते २०२० दरम्यान देशात जप्त करण्यात आलेल्या २००० रुपयांच्या बनावट नोटांची संख्या २,२७२ वरुन २,४४,८३४ वर पोहोचली आहे. आकडेवारीनुसार २०१६ मध्ये देशात २००० रुपयांच्या बनावट नोटांची संख्या २,२७२ होती.

## कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री

शपथ घेणार आहेत. तसेच. शिवकुमार यापूर्वी सिद्धरमय्या यांच्या सरकारमध्ये मंत्री होते, ते पुढील वर्षी होणाऱ्या संसदीय निवडणुकीपर्यंत कर्नाटक प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहतील. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी अध्यक्ष सोनिया गांधी आणि राहुल गांधी, काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी, अनेक मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. योग्य संयोजन असलेलं मंत्रिमंडळ, सर्व समुदाय, प्रदेश, गट यांचे प्रतिनिधी आणि जुन्या आणि नव्या पिढीतील आमदार यांच्यात समतोल राखणे, हे नव्या मुख्यमंत्र्यांसमोरील आव्हान असेल.

## सामान्य माणसांपर्यंत शासकीय

जलसाठे मोठ्या प्रमाणात वाढल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत उपमुख्यमंत्र्यांनी आग्रही भूमिका घेत तातडीने सर्व वीज जोडण्या पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले.वितरण विभागाने गेल्या वर्षीच्या प्रलंबित जोडणीला प्राधान्य देण्याबरोबरच यावर्षीच्या जोडण्याही पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. याशिवाय सौर -पंप योजनेसाठी जागरूकता निर्माण करण्याचे सांगितले. श्री. फडणवीस यांनी प्रामुख्याने जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत दोन्ही तालुक्यांमध्ये सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. अभियानांतर्गत स्थानिक स्वयंसेवी संस्था व लोकसहभागाची माहिती जाणून घेतली. प्रधानमंत्री आवास योजना,भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबतची सद्यस्थिती, स्वच्छ भारत अभियान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसामुंडा कृषी क्रांती योजना,राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत नवीन विहिरींचे वाटप,विद्युत जोडणी आदींबाबत आढावा घेतला. शिवाय आरोग्य, शिक्षण, कृषी व खरीप पूर्व तयारी विषयीचा आढावाही या बैठकीत घेण्यात आला.

आढावा बैठकीस जिल्हा परिषद अध्यक्ष मुक्ता कोकड्डे, खासदार कृपाल तुमाने, आमदार सुनिल केदार, चंद्रशेखर बावनकुळे, टेकचंद सावरकर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, जिल्हा परिषद उपाध्यक्ष कुंदा राऊत,महिला बालकल्याण समिति अध्यक्ष अवंतिका लेकुरवाळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र मनोहरे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख व उपविभागीय स्तरावरील अधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी इंडो ईस्त्रायल प्रकल्पांतर्गत नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्याच्या तेलगाव येथील उर्मिला राऊत यांना आणि कृषि यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील अजनी येथील रामदास उमाटे यांना त्यांच्या हस्ते ट्रॅक्टर वितरीत करण्यात आले.बैठकीचे सादरीकरण उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे यांनी केले.

## ज्या कारागृहात उद्घाटन केले, त्याच

त्यांना परत १६ मे रोजी न्यायालयात हजर केले असता त्यांची २९ तारखेपर्यंत न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. आता कुरुळकर येरवड्यात कारागृहात आहेत. त्यांना २९ तारखेला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

येवरवडा कारागृहात ठोकले होते भाषण : प्रदीप कुरुलकर संरक्षण संशोधन संस्थेचे (डीआरडीओ) संचालक असताना ते अनेक कार्यक्रम, व्याख्यानांना हजेरी लावत असत. कुरुळकर यांनी स्वातंत्र्यसैनिक सावरकरांवरही अनेक व्याख्याने दिली आहेत. सात महिन्यांपूर्वी १४ ऑक्टोबर २०२२ रोजी दिवाळीनिमित्त कुरुळकर प्रमुख पाहुणे म्हणून येरवडा कारागृहात गेले होते. त्यानंतर त्यांनी तेथील कैद्यांनाही संबोधित केले. पण सात महिन्यांनंतर कैद्याप्रमाणे त्याच तुरुंगात जाण्याची वेळ येईल, असे स्वप्नातही त्यांना वाटले नव्हते. मात्र, आज शत्रू पाकिस्तानला गोपनीय माहिती दिल्याच्या आरोपावरून कुरुलकरांवर येरवडा तुरुंगात जाण्याची वेळ आली आहे.

सरकारी पासपोर्टवर सहा देशांना भेटी : पुण्यातील संरक्षण संशोधन संस्थेचे (डीआरडीओ) संचालक प्रदीप कुरुळकर यांच्या एटीएसने केलेल्या तपासादरम्यान विविध बाबी समोर आल्या आहेत. कुरुलकर यांनी सरकारी पासपोर्टवर सहा देशांना भेटी दिल्या आहेत. या दौऱ्यात त्यांनी तरुणीसोबत भारत-पाक सामना पाहिल्याचे समोर आले आहे. तसेच अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. तपास यंत्रणेने या मेलची तपासणी केली असता अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. तपास यंत्रणेच्या हाती आलेल्या मेलमध्ये क्रिकेट सामने, खेळांबाबत पाच ओळींचा मजकूर आहे. आजचा सामना खेळल्यानंतर, 'चला डान्सबारमध्ये जाऊ, मजा करू' असा संदेश आढळला. या प्रकणाचा अधिक तपास एटीएस करत आहे. हनीट्रॅपमध्ये अडकलेले कुरुलकर केवळ सोशल मीडिया व्हॉटसअप, फेसबुकवरच संवाद साधत नव्हते, तर कुरुलकर ई-मेलद्वारे पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात होते असे तपासात समोर आले आहे.

डीआरडीओच्या गेस्ट हाऊसमध्ये महिलांची : भेट प्रदीप कुरळकर यांनी डीआरडीओच्या गेस्ट हाऊसमध्ये काही महिलांची भेट घेतली आहे. ती महिला नक्की कोण आहे? या भेटीमागचे कारण काय? याचा तपासही एटीएसमार्फत करण्यात आला आहे. विशेषत: कुरुलकर यांनी सरकारी पासपोर्टचाही वापर केला. या संपूर्ण काळात कुरुळकर सहा देशांना भेटी दिल्या आहेत.

## कोणत्या देवाने सांगितले की मुल

जाती-धर्मातील लोक हे गुण्या गोविंदाने राहत आहेत. आपण पण अजमेर येथे चादर चढविण्यासाठी जात असतो. आपल्याला प्रत्येकाबाबत आदर आहे. त्र्यंबकेश्वर बाबत स्थानिकांनी सांगितले की, तिथे ही परंपरा १०० वर्षांपूर्वीची आहे. आता अशा गोष्टी जाणीवपूर्वक घडवून आणल्या जात आहेत. सोशल मीडियाचा वापर करून समाजात तेढ निर्माण केले जात आहे. याचे जे कोणी मास्टरमाईंड असेल त्याने हे सर्व थांबविले पाहिजे, असे अजित पवार म्हणाले.

तर विकास कामे कशी होणार? पुणे जिल्ह्यात जवळपास २१ जागा या विधानसभेच्या आहेत. त्यातील १३ जागा या विरोधी पक्षाकडे आहेत. ८ ते ९ आमदार हे सत्ताधारी पक्षाचे आहेत. निधीचा वापर होत असताना काही स्वीकृत सदस्य घेण्यात आले आहेत.

मागच्या वेळेस निधी वाटप करताना काही आमदारांवर अन्याय झाला होता. आम्ही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना विनंती केली की, असे चालणार नाही. आमदारांना कमी निधी मिळाला तर विकास कामे कशी होणार, यावर चर्चा झाली. तसेच अनेक कॉन्ट्रॅक्टर आहेत की, ज्यांना निधी मिळालेले नाहीत. यावर आज चर्चा झाल्याचे अजित पवारांनी सांगितले.

# 'शिवरायांची जगदंबा तलवार, वाघ नखे यावर्षीच महाराष्ट्रात आणणार'

मुंबई : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देणारी, सुप्रसिद्ध जगदंबा तलवार ही सध्या ब्रिटन मधल्या संग्रहालयात आहे. भारत स्वतंत्र होताना इंग्रजांनी ही सुप्रसिद्ध तलवार आपल्यासोबत नेली तसेच अफजलखानाचा वध करताना शिवरायांनी वापरलेली ऐतिहासिक महत्त्व असलेली वाघ नखही, इंग्रजांनी आपल्या सोबत नेली होती. या दोन्ही गोष्टी ब्रिटनच्या वस्तू संग्रहालयात आहेत.

ब्रिटिशांशी केला पत्र व्यवहार: दरम्यान मराठी साम्राज्याची ऐतिहासिक ठेव असलेल्या आणि मराठ्यांचा जाज्वल्य इतिहासाचा वारसा सांगणाऱ्या, छत्रपती शिवरायांची जगदंबा तलवार आणि सुप्रसिद्ध वाघ नखे परत भारतात महाराष्ट्रात आणण्यासाठी ब्रिटन सरकार बरोबर राज्य सरकारने पत्रव्यवहार केला असल्याची माहिती सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

छत्रपती शिवराय हे मराठी माणसाचे आराध्य दैवत आहे. या दैवताची दोन्ही अस्त्रे ज्याला वैभवशाली इतिहास आहे. ती महाराष्ट्रात परत आणल्यानंतर मराठी माणसाचा आनंद शिगेला पोहोचल्या शिवाय राहणार नाही. यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचेही मुनगंटीवार यांनी सांगितले.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सरकारची पावले: २०२४ हे वर्ष छत्रपती शिवरायांच्या शिवराज्याभिषेकाच ३५० व वर्ष आहे. या ३५० व्या वर्षानिमित्त छत्रपतींची जगदंबा तलवार आणि वाघ नखे महाराष्ट्रात परत आणली जाणार आहेत. सध्या तरी एक वर्षाच्या मुदतीवर ही दोन्ही अस्त्र महाराष्ट्रात मराठी जनतेला आणि संपूर्ण भारताला पाहायला मिळावी, यासाठी मागणी करण्यात आली आहे.

तुकडोजी महाराजांच्या जीवनावर चित्रपट: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अध्यात्म कार्य आणि समाजकार्य हे वाखाण्याजोगे आहे.

मात्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे साहित्य आणि चित्रपट सध्या नाहीत. तुकडोजी महाराजां प्रमाणेच अन्य संत आणि महंतांच्या समाजकार्यावर आधारित चित्रपटांची निर्मिती करण्याचा सरकारने विचार केला आहे. मात्र सध्या तरी संत तुकडोजी महाराज यांच्या चित्रपटाबाबत सरकार सकारात्मक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# दगडूशेठ गणपती देवस्थानाला 'क' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा

पुणे : जिल्हा परिषद शाळा, रस्ते आणि अंगणवाड्यांच्या बांधकामाबाबत स्वतंत्र बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात येईल. शाळांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी उपलब्ध करून देण्यात येईल. शाळांमध्ये स्वच्छतागृहाची व्यवस्था असेल याची दक्षता घ्यावी, असे यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधीवाटप: पुणे शहरात नव्याने समाविष्ट झालेली गावे लक्षात घेता तेथील सुविधांसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत देण्यात येणाऱ्या निधीत वाढ करण्यात आली आहे. शहर आणि ग्रामीण पोलीस दलाला वाहनांसाठी आवश्यक निधी देण्यात येत आहे. पोलिसांनी अद्ययावत साहित्याची मागणी केल्यास अधिकचा निधी देण्यात येईल, तसेच सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे देखील यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले.पालकमंत्र्यांचे निर्देश: इंद्रायणी मेडिसिटीबाबत आरोग्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल. जिल्हा परिषदेने जिल्हा नियोजन समिती अंतर्गत प्राप्त निधीतून कामांचे नियोजन वेळेवर करावे. दौंड, इंदापूर आणि बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांना पुरेशी वीज मिळावी यासाठी महावितरणने आवश्यक कार्यवाही करावी. जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम पावसाळ्यापूर्वी करावे, असे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# ‘शासन आपल्या दारी’ मोहिमेत कृषी विभाग देणार विविध योजनांचा लाभ

पंढरपूर/प्रतिनिधी : शासन आपल्या दारी अभियानाच्या माध्यमातून विविध विभागामार्फत लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात येणार आहे. या अभियानातर्गंत कृषी विभागामार्फत खरीप हंगामपूर्वी शेतकऱ्यांना आपल्या शेतीकरीता विविध योजनांचा लाभ देणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी दिली.

खरीप हंगामात शेतामध्ये विविध पिकांची लागवड करण्यात येते.

खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा हंगाम असून, खरीप हंगामातील पिकांना पूरक ठरणाऱ्या विविध योतनेतर्गंत मोहीम सुरु करण्यात येत आहे. मका आणि ऊस उत्पादन वाढीमध्ये बीज प्रक्रिया हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून जमिनीतून व बियांणाद्वारे पसरणाऱ्या रोग व किडींचा प्रादुर्भाव कमी करून पिकांची जोरदार वाढ होण्यासाठी बीज प्रक्रिया कमी खर्चात अत्यंत प्रभावी साधन आहे.

या दृष्टीने खरीप हंगामात जास्तीत जास्त क्षेत्रावर बीज प्रक्रिया केलेल्या बियाणांची पेरणी करण्याच्या दृष्टीने बीज प्रक्रिया मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाडीबीटी या पोर्टलच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजनेचा लाभ देण्यात येतो. यामध्ये कृषी यांत्रिकीकरण, शेततळे, अस्तरीकरण, फळबाग लागवड, कांदा चाळ अशा विविध योजनांचा लाभासाठी शेतकऱ्यांकडून अर्ज भरुन घेणे.हुमणीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी हुमणी नियत्रंण व प्रकाश सापळे बसविणे मोहिम राबविण्यात योणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांनी सांगितले. पंढरपूर तालुक्याची पीक पध्दती व आव्हाने लक्षात घेवून तालुक्यातील साखर कारखाने, कृषी निविष्ठा विक्रेते यांच्या माध्यमातून प्रसार व प्रचार करण्यासाठी कृषी विभागाने आवश्यक नियोन केले असून, तालुक्यातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्री.सरडे यांनी केले आहे.

# नवज्योत क्रिडा मंडळ वाचनालयास मदतीचे आवाहन

## मातोश्री शालन आनंदा रणखांबे यांच्या हस्ते वाचनालयास पुस्तके भेट



कल्याण/प्रतिनिधी: नवज्योत क्रिडा मंडळ आनंदवाडी कल्याण पूर्व येथे सर्वांसाठी नवज्योत क्रिडा मंडळ वाचनालय लवकरच सुरू करण्यात येत आहे. त्यासाठी मदतीचे आवाहन मंडळामार्फत करण्यात आले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत सुप्रसिद्ध साहित्यिक जीवनसंघर्षकार नवनाथ आनंदा रणखांबे यांनी मातृत्व दिनाचे औचित्य साधून मातोश्री शालन आनंदा रणखांबे यांच्या हस्ते मंडळ कार्यालयात जाऊन ६५ पुस्तके मदत भेट म्हणून दिले आहेत. पुस्तकांचा स्विकार मंडळाचे माजी उपाध्यक्ष दिपक भाऊ मारवाड यांनी केले. मंडळाचे अध्यक्ष सतिश जाधव यांनी जीवनसंघर्षकार व त्यांच्या मातोश्रींचे आभार मानले आहे. मंडळाचे अध्यक्ष सतिश जाधव, सरचिटणीस महेंद्र कांबळे, खजिनदार सुनिल गांगुर्डे, महेश जाधव, अशोक दोडले, राजेश कोलकूंडे, नितीन धाकतोडे, विजय डिगे ,विजय पवार, समीर मालुसरे, योगेश मालुसरे, सुरेश सहाणी, कार्तिक सहाणे, मंडळाचे माजी अध्यक्ष व सल्लागार संजय डिगे व सुनिल आण्णा बर्वे यांनीही जीवनसंघर्षकार यांचे विषेश आभार मानले आहेत .

मंडळाच्या वतीने नागरिकांना आणखीन मदत करण्याचे आवाहन करण्यात येत असून कुणाला मदत करायची असल्यास अनिल शिंदे ९१५२६९३८१८, सुनिल गांगुर्डे ९९२०३६७४३३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

# पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी हरिष गायकवाड, उपसभापतीपदी राजू गावडे



पंढरपूर/प्रतिनिधी: कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी हरिश गायकवाड व उपसभापतीपदी राजू गावडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. बाजार निवडणूकीत माजी आ. प्रशांत परिचारक यांचे पॅनल विजयी झाले. या नंतर सभापतीपदी म्हणून कोणाची वर्णी लागणार याकडे शेतकरी, व्यापाऱ्यांचे लक्ष लागले होते.

बैठकीत सभापतीपदासाठी हरिश गायकवाड, दिनकर चव्हाण, राजू गावडे नावाची चर्चा झाली. मात्र अंतिम निर्णय घेण्याचे अधिकारी परिचारक यांना देण्यात आला होता सभापती व उपसभापती निवड करण्यासाठी संचालक मंडळाची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी सावे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी सभापती पदासाठी हरिष गायकवाड व उपसभापती पदासाठी राज गावडे यांचे एक एक अर्ज दाखल झाले. म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी सावे यांनी दोघांची बिनविरोध निवड केली. असल्याचे जाहिर केले. यावेळी युटोपियन कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक, वामन माने, सुभाष माने आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. नूतन सभापती व उपसभापतीची निवड झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण, फटाक्याची आतिषबाजी करून आनंद उत्सव साजरा केला.




# वंचित युवक आघाडीचा जाहीर पाठिंबा

कळंब/प्रतिनिधी: उस्मानाबाद/धाराशिव गेली अनेक वर्षापासून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची मागणी मातंग समाजाकडून करण्यात येत आहे. अनेक वेळा आंदोलन करूनही मागणी मान्य न झाल्यामुळे मातंग समाजाकडून आंदोलन करण्यात येत आहे.त्या आंदोलनास वंचित बहुजन युवा आघाडीने जाहीर पाठिंबा दिला व तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन ही देण्यात आले आहे. आंदोलन करताना आश्वासित केले की या मागणीसाठी वंचित बहुजन युवा आघाडी देखील रस्त्यावर उतरून आंदोलन करून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी लढाई लढेल यावेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष शितल चव्हाण, वंचित बहुजन आघाडी महासचिव बाबासाहेब जानराव, विद्यानंद वाघमारे, जिल्हा संघटक बाबा वाघमारे, नामदेव वाघमारे, तसेच अनेक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनी जनजागृतीपर कार्यक्रम राबवावेत : पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे

## जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक संपन्न



सोलापूर/प्रतिनिधी: २६ जून जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. यासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात यावेत.

तसेच प्रत्येक सदस्यांकडे दत्तक देण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये शाळा/महाविद्यालये सुरू झाल्यानंतर प्रस्तावित कार्यक्रमांचा आराखडा तयार करावा, अशा सूचना जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे यांनी आज येथे दिल्या.

जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या बैठकीस राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक, सिव्हील हॉस्पिटलचे प्रतिनिधी डॉ. रोहन वायचळ, टपाल विभागाचे एम. आर. पल्लेवाड, प्रभारी अधिकारी लोहमार्ग पोलीस ठाणे प्रतिनिधी एस. भाजीभाकरे, प्रदीप पवार आदिंसह समितीचे सदस्य उपस्थित होते.जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे म्हणाले,

अंमली पदार्थ सेवन व त्याचे दुष्परिणाम, त्याबाबतचे कायदे यासंदर्भात जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये भेट देऊन अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम हाती घ्यावी. यातून भावी पिढी अंमली पदार्थांच्या विळख्यापासून सुरक्षित राहील, समिती सदस्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही प्रकारे अंमली पदार्थ उत्पादन होत नसल्याबद्दल दक्ष राहावे. अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या

# दहा वर्षे झाले असेल तर आधार कार्ड अपडेट करा जिल्हाधिकारी: डॉ. सचिन ओम्बासे

कळंब/प्रतिनिधी : उस्मानाबाद प्रत्येक शासकीय कामकाजासह इतर सर्वच ठिकाणी आता आधार क्रमांक महत्त्वपूर्ण झालेला आहे. नागरिकांना मिळालेला हा युनिक आयडी आहे. या आधार क्रमांकावर अनेक कामे अवलंबून आहेत. आधार कार्ड वर नागरिकांची अत्यावश्यक माहिती अपडेट असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक १० वर्षाला आधार कार्ड अपडेट करणे आवश्यक आहे. उस्मानाबाद शहरासह जिल्ह्यातील बहुतांश नागरिकांनी आधार अपडेशन केलेले नाही. आधार अपडेशन अभावी अनेक अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी दर दहा वर्षांनी आधार कार्ड अपडेट करणे आवश्यक आहे.ज्यांचे आधार कार्ड काढून दहा वर्षे पूर्ण झालेले आहेत त्यांनी त्यांचे आधार कार्ड अपडेट करून घेण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.दर दहा वर्षांनी शरीरात होणारे बदल, नागरिकांचे होणारे स्थलांतर, वैयक्तिक माहिती मध्ये होणारे बदल, आधार सोबत लिंक केलेल्या मोबाईल क्रमांकात झालेला बदल, पॅन कार्ड सोबत लिंक करण्यात आलेला आधार क्रमांक, आधार कार्ड वरील फोटो, बदल झालेला पत्ता, इतर आवश्यक माहिती आधार कार्ड वर अपडेट करणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्यांचे आधार कार्ड काढून दहा वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांची वरील प्रमाणे आधार कार्ड वरील आवश्यक माहिती अपडेट करून घेण्यात आली याबाबत आपणास णखऊ-ख त्यांच्याकडून डचड द्वारे ही सुचित करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सर्व नागरिकांना याद्वारे आव्हान करण्यात येते की आपण आपले आधार कार्ड अपडेट करून घ्यावे.



१) आधार कार्ड कोठे अपडेट केले जाईल? उस्मानाबाद शहरासह जिल्ह्यातील पोस्ट कार्यालय, सीएससी केंद्र, महिला व बालविकास विभाग, जी.प बँक, महा-ई-सेवा केंद्र चालकाकडील आधार केंद्र इत्यादी ठिकाणी आधार कार्ड अपडेट करण्यात येईल.

२) आधार कार्ड अपडेट करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड अपडेट करताना मतदान कार्ड, पॅन कार्ड,विजेचे बिल, किंवा पत्ता दर्शविणारे ओळखपत्र, इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता आहे.

३) पहिल्यांदा आधार कार्ड काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रे पॅन कार्ड, विजेचे बिल, किंवा पत्ता दर्शविणारे ओळखपत्र, इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता आहे.


४) ० ते ०५ वर्षाच्या मुलांचे आधार कार्ड काढणे आवश्यक आहे, अशा बालकांची आधार नोंदणी अंगणवाडीमध्ये किंवा हॉस्पिटलमध्ये करण्यात येते. पाच वर्षानंतर आधार कार्ड अपडेट करून घ्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.



# सोलापूर येथील मित्र परिवाराच्या वतीने कमलाकर सोनकांबळे यांचा वाढदिवस साजरा

अक्कलकोट : गोगांव ग्रामपंचायत उपसरपंच तथा दैनिक यश सिध्दी न्युज संपादक कमलाकर सोनकांबळे यांच्या वाढदिवसा निमित्त सोलापूर येथील मित्र परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आले यावेळी राजाभाऊ सरवदे यांचे कट्टर समर्थक युवा नेते बसवराज सोनकांबळे, बॉबी ग्रुपचे अश्विन गायकवाड, महेश गजधाने , नितीन हलासंगी, राजेश खामितकर, अमोल पुटगे, नागेश भोसले, आदी उपस्थित होते

## शब्दकोडे क्र १४०



आडवे शब्द १. प्रवासात उपयोगी ३. पाण्याचा साठा, तळे ७. बळजबरीचा मुक्काम ११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे १२. धातूचा नाजूक तंतू १३. लाकडाची उत्कृष्ट जात १४. समुदाय, गट १६. एक नैसर्गिक शीतपेय १७. थडगे १८. मृत्यू नसलेला १९. मान, प्रतिष्ठा, बूज २०. सुकुमार २१. चंदन उगाळण्याचा दगड २४. मधली खोली २६. गावातील देवाचा उरुस २७. 'एनओसी' मराठीत ३१. पुढारी ३२. लढाई, चकमक ३३. जागृत, चकमक ३३. जागृत, स्थान ३५. हुशार, चलाख ३७. श्रेष्ठ पुरुष ३९. सुतळीचे कापड ४२. तिंबा! ४४. पुत्र, मुलगा ४६. फसविणे ४८. कान व डोळे ताठ करणे ५०. सैन्याचा मालपुरवठा ५२. वजा ५३. सरस्वतीचे एक नाव ५६. माराची खूण ५७. क्षण (हिंदी) ५८. ओलसर हवा ६०. पुन्हा पुन्हा ६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी ६४. पुंकेसर ६५. मत्स्य ६७. बोलणे ६९. मुलगा ७०. टाळ्यांचा जोरदार आवाज ७१. अगम्य ७३. खटला ७५. स्तुती करणारा ७६. अस्वल ७७. जन्म, मृत्यू ७८. तटबंदी

उभे शब्द १. चाहता २. यामुळे रामायण घडले ३. जन्मदात्री ४. नेहमी बुजणारा ५. बाण ६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान ७. ठाण्याचा रहिवासी ८. वाघाची मावशी ९. भीती, भय १०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव १३. सामोपचार १५. भाताला दिलेला आकार १८. धाकटा भाऊ २०. हुक्की, लहर २१. च्या बरोबर २२. जय-पराजय २३. कर्ज, उपकार २४. फक्त, केवळ २५. जाते फिरतानाचा आवाज २६. जन्मापासून २७. ख्रिसमस २८. शिव्याशाप २९. हत्तीचा शिक्षक ३०. वारा ३२. वर्ष ३४. थंडीने गार पडणे ३६. दारूचा एक प्रकार ३८. आवाज, गोंगाट ४०. रोखलेली नजर ४१. एक जंगली फूल ४३. वरपांगी ४५. सोसाट्याचा वारा ४७. अवाढव्य, भव्य ४९. उणे ५१. नवऱ्याची दुसरी पत्नी ५२. संयम सुटलेला, अधीर ५४. बरणीला लावण्याचे फडके ५५. विहीर, --नलिका ५७. मान्यतापत्र ५९. नंतर ६०. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना ६१. थेट, सरळ ६२. धोबी ६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात ६६. बडबड ६८. नोकरी ७१. शर्त, पण ७२. फोडातील द्रव ७४. डावा

# जळकोट येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त भव्य मिरवणूक

वागदरी/एस.के.गायकवाड : जगातील पहिले महात्मा ,लोकशाहीचे आद्य जनक, जगात सर्वप्रथम शिवानुभव मंडप नावाने लोकशाहीची संसद स्थापन करणारे, सर्वधर्मसमभाव जोपासणारे महान क्रांतिकारक



वीरशैव लिंगायत धर्माचे प्रचारक व प्रसारक, समता नायक, क्रांतीसुर्य जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे सहवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी डीजेच्या व हलगीच्या निनादात येथील तरुणाने अत्यंत जल्लोषात मिरवणुकीची सुरुवात केली. महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्सव कमिटीच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराजांच्या भव्य अशा पुतळ्याचे पूजन करून बसवेश्वर चौकातून फटाक्यांची आतिषबाजी करत मिरवणूकीस सुरुवात करण्यात आली.ही मिरवणूक प्रेमनाथ चौकापासून मुख्य बाजारपेठ छत्रपती शिवाजी महाराज चौकात येताच येथील राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास जयंती उत्सव कमिटीच्या वतीने पुष्पहार अर्पण करून.मिरवणूक राष्ट्रीय महामार्गावरून छत्रपती संभाजी नगर ते शिवनेरी गल्ली, आधी भागातून.केदारलिंग मंदिरा जवळ जयंती मिरवणूकीची सांगता करण्यात आली. मिरवणुकी दरम्यान चौका, चौकामध्ये महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून महात्मा बसवेश्वर महाराज यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी जयंती उत्सव कमिटी अध्यक्ष सागर राजमाने, उपाध्यक्ष वैभव स्वामी, सचिव अभिजीत कवठे, सहसचिव संगमेश्वर पाटील, खजिनदार सचिन माळगे, व वीरशैव समाज बांधव तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रत्येकाने नागरिक म्हणून कर्तव्य पालन केल्यास जीवनमान उन्नत होईल : राज्यपाल रमेश बैस

मुंबई : नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची सुलभता वाढविण्यासाठी शासनाची भूमिका निश्चितच महत्त्वाची आहे. परंतु, सुशासनासाठी समाजाचा आणि नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. 'हा देश माझा आहे' आणि 'हे शहर माझे आहे' ही भावना ठेवून प्रत्येकाने नागरी कर्तव्याचे पालन केल्यास एकूणच समाजाचे जीवनमान उन्नत होईल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले. इंडियन मर्चंट चेंबरतर्फे आयोजित तिसऱ्या 'इज ऑफ लिविंग: नागरिकांचा मूलभूत अधिकार' या विषयावरील परिषदेचे उद्घाटन राज्यपाल श्री.बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते.उद्घाटन सत्राला इंडियन मर्चंट चेंबरचे अध्यक्ष अनंत सिंघानिया, पदनिर्देशित अध्यक्ष डॉ. समीर सोमैया, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर व 'आयएमसी - इज ऑफ लिविंग समिती'चे अध्यक्ष एम के चौहान, वरिष्ठ शासकीय व नागरी सेवा अधिकारी तसेच उद्योजक प्रामुख्याने उपस्थित होते.

सुशासनासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे असे सांगताना राज्यपालांनी सार्वजनिक हिताच्या कार्यात मुंबईतील दानशूर उद्योजकांनी केलेल्या कार्याची जंत्री सादर केली.जमशेद जीजीभॉय यांच्या दातृत्वामुळे जे जे हॉस्पिटल निर्माण झाले तर ससून कुटुंबियांमुळे डेव्हिड ससून वाचनालय उभे राहिले. नाना शंकरशेट यांच्या दातृत्वामुळे निर्माण झालेली स्मशानभूमी आजही समाजाला सेवा देत आहे असे सांगून कॉर्पोरेट जगताने महिलांसाठी अधिक स्वच्छतागृहे निर्माण करावी असे आवाहन राज्यपालांनी केले.

जनसामान्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी मुंबईतील रस्ते सुधारण्याची गरज आहे.मुंबई शहरात रस्ते सदैव वाहतुकीने भरलेले असतात, लोकल ट्रेनमध्ये गर्दी असते. हा भर कमी होण्यासाठी जलवाहतूक सुरु झाली पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.देशात 'स्मार्ट सिटी' संकल्पना येण्यापूर्वीच 'नया रायपूर' हे स्मार्ट शहर निर्माण झाले व त्याठिकाणची



जीवनमान सुधारले असे त्यांनी सांगितले. ॉर्पोरेट रुग्णालयांनी एक दिवस जनता ओपीडी सुरु करावी

आज अनेक कॉर्पोरेट हॉस्पिटल्स आहेत. त्यांनी जनसामान्यांसाठी किमान एक दिवस निःशुल्क सेवा दिली तर सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल असे राज्यपालांनी सांगितले.जनसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी नागरिकांची सुरक्षा महत्वाची आहे असे सांगताना नागरिकांनी मूलभूत कर्तव्यांचे पालन केल्यास पोलिसांचेही काम सुलभ होईल असे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.पोलिसांकडे समाजातील सर्व लोकांकडून वेगवेगळ्या तक्रारी येतात परंतु पोलीस दलाशी संबंधित नसून देखील पोलीस लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करतात असे त्यांनी सांगितले. सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये लोक अनेकदा परस्पर सहकार्य करत नाही व तक्रारी पोलिसांपर्यंत येतात या विरोधाभासाकडे त्यांनी लक्ष वेधले. आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे वाढत आहेत तसेच वाढत्या वाहन संख्येमुळे रस्त्यांवरील ताण देखील असह्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.इंडियन मर्चंट चेंबरचे अध्यक्ष अनंत सिंघानिया यांनी प्रास्ताविक केले तर आयएमसी इज ऑफ लिव्हिंग परिषदेचे अध्यक्ष एम के चौहान यांनी परिषदेच्या आयोजनामागची पार्श्वभूमी विशद केली.

# जलींदर कांबळे यांचे दुःखद निधन



वागदरी/प्रतिनिधी : हगरंगा (नळ )ता.तुळजापूर येथील फुले शाहू आंबेडकर चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते माजी सरपंच मोहन कांबळे याचे वडील जालींदर मरगा कांबळे यांचे व्रध्दपकाळी वयाच्या ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

हंगरगा नळ येथे त्यांच्या पार्थिवावर बौद्ध धम्म पध्दतीने अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या दुःखद निधना बद्दल त्यांना समाजातील सर्व स्तरातून भावपूर्ण श्रध्दांजली वहाण्यात आली.त्यांच्या पश्चात पाच मुले,दोन मुली सूना,जावाई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# रेल्वे टीसी सोबत वाद ,होणार कॅमेऱ्यात कैद

पनवेल/प्रतिनिधी : मध्य रेल्वे विनातिकीट प्रवास करणार्‍यां नागरिकांवर होणार कठोर कारवाई रेल्वे प्रशासनाने राबवला अगळा-वेगळा उपक्रम नोकरदार तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनातील अमूल्य घटक म्हणून रेल्वेची ओळख आहे. अनेकदा रेल्वे मधून प्रवास करतांना तिकीट तपासणी होत असते, यामुळे अनेक विनातिकिट प्रवास करणारे नागरिक तिकीट तपासणी अधिकाऱ्यांशी वाद घालतांना आपल्याला पाहण्यास मिळतात. अनेकदा गर्दुल्ले आणि माध्यपान करून प्रवास करणारे प्रवासी रेल्वे कर्मचाऱ्यांवर हल्ले देखील करत असतात . आता या सर्व प्रकारांवर आळा बसणार आहे.



मध्य रेल्वे ने यासाठी एक अगळा वेगळा उपक्रम राबवण्यात आला आहे. मध्य रेल्वेचे मुख्यालय मुंबई येथे तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या (TC) कोर्ट वर उजव्या बाजूस कॅमेरा बसवण्यात आला आहे. तिकिट तपासणी दरम्यान होणारा सर्व प्रकार कॅमेऱ्यामध्ये व्हिडिओच्या माध्यमात कैद होणार आहे. यामुळे विनातिकीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर पुराव्या सहित कठोर कारवाही होणार आहे.

विनातिकीत प्रवास शिक्षा काय?

रेल्वे मध्ये विनातिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या खूप वाढली आहे. अनेकदा प्रवासी सेकंड क्लास चे तिकिट काढून फस्ट क्लासमधून प्रवास करतात. रेल्वे कायद्यानुसार विनातिकिट प्रवास करणे गुन्हा आहे. लोकल रेल्वे मधून विनातिकिट प्रवासकेल्यास २६० रुपये दंड आहे. तसेच तिकिट तपासणी अधिकाऱ्यांशी वाद घातल्यास रेल्वे कायदा कलम १४६ नुसार ६ महिने कारावास व १००० रुपये दंड अशी शिक्षा आहे.




# संत ज्ञानेश्वर उद्यान हे जागतिक दर्जाचे उद्यान बनणार : सदीपान भुमरे

औरंगाबाद, : पैठणच्या संत ज्ञानेश्वर उद्यानाच्या विकास कामांसाठी सात कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून वाहनतळ, अंतर्गत रस्ते व अत्याधुनिक संगीत जलकारंजे यांच्या कामांना प्रारंभ झाला आहे. अनेक पर्यटकांचे आकर्षण असलेल्या या उद्यानाला जागतिक दर्जाचे उद्यान बनविणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी केले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद अंतर्गत पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानच्या विकास कामांचा भुमिपुजन कार्यक्रम रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कृषी आयुक्त सुनील चव्हाण,पाटबंधारे विभागाचे अधिक्षक सबनवार,अभियंता अशोक चव्हाण याची प्रमुख उपस्थिति होती.

भुमरे म्हणाले संत ज्ञानेश्वर उद्यानाला जागतिक दर्जा कसा मिळेल यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. चाळीस वर्षापूर्वी उद्यान जसे होते तसेच करण्यात येईल. या ठिकाणी जागा भरपूर असल्याने पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना येथे निवास व्यवस्था देखील करण्यात येईल. उद्यानाच्या विकासासाठी निधीची कमतरता पडणार नाही. येथे आलेला पर्यटक जास्त दिवस कसा राहिल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे जेणेकरुन रोजगारामध्ये वाढ होईल. संत ज्ञानेश्वर उद्यानाच्या विविध विकास कामे प्रत्यक्षात सुरु झाल्याने सध्या रस्ते,पार्किंग,पाईपलाईन, संगीतकारंजे,ई पहील्या टप्प्यात कामे होणार असुन दुसऱ्या टप्प्यात उर्वरित कामे पूर्ण करून दिवाळी पुर्वी संत ज्ञानेश्वर उद्यान पर्यटकांसाठी नक्कीच खुले करण्यात येईल.सप्टेंबर मध्ये शहरात जागतिक पर्यटन परिषद होणार आहे. या परिषदेतील शिष्टमंडळांना धरण, उद्यान दाखविण्यात येईल असेही ते म्हणाले.

# समाज माध्यमांवरील नागरिकांच्या तक्रारी, निवेदनांवरील कार्यवाहीसाठीची यंत्रणा त्वरित कार्यान्वित करावी : मुख्यमंत्री

मुंबई : नागरिक आपल्या सूचना व तक्रारी शासनाशी संबंधित विविध समाज माध्यमांतून मांडत असतात. त्यावर तत्काळ कार्यवाही होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे आपले सरकार आणि मुख्यमंत्री सचिवालय अशी संयुक्त यंत्रणा उभारण्यात येत असून ती त्वरित कार्यान्वित करण्याची सूचना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.



आज सह्याद्री अतिथीगृह येथे माहिती तंत्रज्ञान विभागाच्या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासंदर्भात बैठक पार पडली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. माहिती तंत्रज्ञान प्रधान सचिव पराग जैन आणि माहिती तंत्रज्ञान संचालक जयश्री भोज यांनी यासंदर्भात सादरीकरण केले.नागरिक पारंपरिक पद्धती व्यतिरिक्त ईमेल, ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम तसेच इतर समाज माध्यमातून शासनाकडे सूचना, तक्रारी, निवेदने पाठवित असतात. त्यावर कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागांना त्या पाठवणे, पाठपुरावा तसेच नागरिकांना याविषयी माहिती मिळत राहणे गरजेचे आहे, माहिती तंत्रज्ञान विभाग हा आपले सरकार टीमच्या मदतीने ही यंत्रणा उभारत असून ती लवकर कार्यान्वित करावी जेणेकरून नागरिकांना त्याचा उपयोग होईल असे मुख्यमंत्री म्हणाले.

**नागरिकांना योजनांची माहिती**

राज्यातील कोणत्याही नागरिकाला आपल्याला राज्य किंवा केंद्राच्या कोणत्या योजनेचा लाभ मिळू शकतो हे आता पोर्टलवरून सहजपणे कळू शकणारी केंद्राप्रमाणे माय स्कीम हे पोर्टलही तयार होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळात देखील अमुलाग्र बदल करण्यात येत असून त्यातून सहज आणि त्वरित आवश्यक माहिती मिळेल याची काळजी घेण्यात येत आहे.

**प्रकल्पांसाठी ट्रॅकिंग सिस्टिम**

राज्यात विविध प्रकल्प सुरु असतात. त्यांच्या कामांवर लक्ष ठेऊन ते त्यांची सद्यस्थिती कळण्यासाठी ट्रॅकिंग सिस्टिम तयर करण्यात येत आहे

**गोल्डन डेटा (सुवर्ण विदा)**

राज्यातील सर्व विभागांचा आणि एकूणच शासनातील सर्व डेटा एकत्रितरीत्या ठेवण्यासाठी गोल्डन डेटा (सुवर्ण विदा) व्यवस्था विकसित करण्यात येत आहे.

**ड्रोनसाठी धोरण** ड्रोनची अनेक कारणांसाठी उपयुक्तता असून शासनात देखील याचा वापर विविध विभाग करतात. यासाठी एक सर्वंकष ड्रोन धोरणही अंतिम होत असून त्याची माहितीही बैठकीत देण्यात आली.

**न्यायालयीन प्रकरणे** एकूणच राज्य शासनाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांची माहिती तसेच सद्यस्थिती व इतर बाबींची माहिती एका क्लिकमध्ये कळण्यासाठी लिगल ट्रॅकिंग सिस्टिम देखील तयार होत आहे याविषयी सांगण्यात आले.

याशिवाय ई ऑफिसच्या माध्यमातून फाईल्सचा निपटारा कशा रीतीने करणे सुरु झाले आहे हेही सांगण्यात आले. भारतनेट चे जाळे राज्यभर पसरविण्याचे काम २६ जिल्ह्यांत मिळून ७७ टक्के झाले आहे याची माहिती देऊन प्रधान सचिव पराग जैन म्हणाले की, २७५१ ग्रामपंचायतीमध्ये कनेक्टिव्हिटी देण्यासाठी बीएसएनएल कार्यवाही करते आहे.

**मुख्यमंत्री डॅश बोर्ड** याशिवाय मुख्यमंत्री डॅश बोर्ड, मुख्यमंत्री हेल्पलाईनविषयी माहिती देण्यात आली. हेल्पलाईनमध्ये चॅटबॉट तसेच व्हॉटसएपचा अंतर्भाव करण्यात आल्याचेही सांगण्यात आले. यामध्ये मुख्यमंत्र्यांना काही महत्वाचा संदेश नागरिकांना द्यायचा असल्यास त्याचीही सोय असेल.

# कोल्हापूर आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटरचे काम वर्षभरात पूर्ण करावे



मुंबई : कोल्हापूर शहरातील राजाराम तलावाच्या काठी अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक घेण्यात आली. कोल्हापूर या ऐतिहासिक शहराच्या वैभवात भर घालणारे हे सेंटर वर्षभरात तयार करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी आमदार चंद्रदीप नरके, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार आदी उपस्थित होते.राजाराम तलावाच्या जवळ तयार होणाऱ्या या कन्व्हेंशन सेंटरमध्ये २००० क्षमतेचे ऑडीटेरिअम, बहुउद्देशीय हॉल, कॉन्फरन्स हॉल, आर्ट गॅलरी, म्फीथिएटर आदी सुविधा असणार आहेत. राजाराम तलावामध्ये संगीत कारंजे, लाईट एंड साऊंड शो ठेवण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.स्थानिक आणि परिसरातील कलावंतासाठी आर्ट गॅलरी, म्फीथिएटर हक्काचे व्यासपीठ होणार असून याठिकाणी शहर आणि परिसरातील छोटे व्यावसायिक, उद्योजक यांना विविध विषयांवर प्रदर्शनासाठी केंद्र उपलब्ध होणार आहे. सेंटर निर्माण करतानाच त्याठिकाणी वृक्षरोपण करून त्याचे सुशोभीकरण करावे. त्याचबरोबर याभागात येणाऱ्या लोकांची संख्या लक्षात घेता पंचतारांकीत हॉटेलसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

या सेंटरसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचे बांधकाम एमएसआरडीसीच्या माध्यमातून करण्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. शहराच्या ऐतिहासिक वैभवात भर घालणारे सेंटर निर्माण करावे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.दरम्यान, यावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील नंदवाळ येथे भारत राखीव बटालियन क्र.३ ला जागा मंजूर करण्याबाबत बैठक घेण्यात आली. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनीअसा जागेवर जाऊन पाहणी करावी आणि लोकांचे हित तसेच भारत राखीव बटालीयनसाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबत चर्चा करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबिरात आज १७५ तक्रारींचे निराकरण

मुंबई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबिर (शासन आपल्या दारी) कार्यक्रमात आज मालाड वेस्ट पी नॉर्थ वॉर्ड येथे १३२ तक्रारी प्राप्त झाल्या तर त्यामधील १०० तक्रारी जागीच निकाली काढण्यात आल्या. तसेच गोरेगाव वेस्ट पी साऊथ वॉर्ड येथे ७५ तक्रारी प्राप्त झाल्या असून सर्व तक्रारी जागीच निकाली काढण्यात आल्या

तसेच ज्या तक्रारी प्राप्त होतील त्या देखील तातडीने सोडविण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.या कार्यक्रमात महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली तसेच बँका आणि महिला आर्थिक विकास महामंडळ आणि विविध विभागांच्या स्टॉलमध्ये शासनाच्या विविध विभागांकडून महिलांकरिता राबविण्यात येणा-या योजनांची माहिती महिलांना देण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबिर (शासन आपल्या दारी) कार्यक्रमात महिलांना तक्रारीसाठी प्रत्येक वॉर्डमध्ये ऑनलाईन अर्जही करता येणार आहे. हा उपक्रम ३१ मे २०२३ पर्यंत दुपारी ३ ते ५.३० वाजता सुरू राहणार आहे.अधिक माहितीसाठी व अर्ज भरण्यासाठी https://forms.gle/7GzCS-CLYsj38amq9 या लिंकवर जाऊन माहिती भरता येवू शकते.